| | |
|---|---|
| MHSN110009172025 | नियमित दिवाणी दावा क्र. २०१/२०२५<br>लक्ष्मण पुजारी/मच्छींद्र पुजारी |

## <u>निशाणी ११ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यामार्फत त्यांची कैफियत मुदतीत दाखल न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे व्यवसायानिमित्त परगावी गेल्यामुळे वकिलांना योग्य ती कागदपत्रे व माहिती वेळेत न दिल्यामुळे प्रस्तुत दाव्यात कैफियत वेळेत देता आली नाही. त्यामुळे प्रतिवादी यांना कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे, त्यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीने त्यांची कैफियत दाखल करुन घेण्याची त्यांनी विनंती केली आहे.

२. वादी यांनी निशाणी ११ येथे प्रस्तुत अर्जास म्हणणे देवून संपूर्ण अर्जाचे खंडण केलेले आहे. वादी यांनी असे नमूद केले आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी विना कैफियत सेट असाईड करीता अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ व २ यांना रितसर दावा समन्स दि. ०१.११.२०२५ रोजी बजावण्यात आलेला आहे. तथापि, प्रतिवादींनी जाणुन बुजून कैफियत देण्यासाठी विलंब केलेला आहे. केवळ वादीस मानसिक त्रास देणे व कोर्टाचा वेळ वाया घालविण्याचा प्रतिवादींचा उद्देश स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा वाटप व कब्जासाठी दाखल करण्यात

आलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिनांक २५/०३/२०२६ रोजी दाखल केलेला आहे. त्यांनी ३० दिवसात आणि तद्नंतर जास्तीत जास्त ९० दिवसामध्ये कैफियत सादर करणे गरजेचे होते. परंतु मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या न्यायनिवाड्यामध्ये सदर ९० दिवसांचा कालावधी हा निर्देशक स्वरुपाचा असल्यामुळे पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी नैसर्गिक न्यायतत्वानुसार त्यांना संधी देणे गरजेचे असल्याबाबत नमूद केले आहे. त्यामुळे, अर्ज मंजूर न केल्यास विनाकारण गुंतागुंत होवून प्रकरणांची संख्या वाढणार आहे. सबब, प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडायला देणे या दाव्याच्या सुनावणीकरीता गरजेचे असल्यामुळे त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करणे मला न्यायोचित वाटते. परंतु प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाबाबत त्यांचेवर कॉस्ट आकारणे उचीत होणार आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करते.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. १ व २ अर्ज वादी यांना र.रु. २००/– (अक्षरी दोनशे रुपये मात्र) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. कॉस्टची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विरुध्द झालेला विना कैफियत आदेश रद्दबातल करुन त्यांनी दिलेली कैफियत सदर कामी वाचण्यात येईल.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2026.05.05 16:36:45 +0530

**आटपाडी.** **(अ. जो. बाचुळकर)**

**दिनांक : ०५/०५/२०२६** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**

**आटपाडी**

*****

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Pramod Shashikant Salunkhe, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 05/05/2026 |
| Order signed by the Presiding Officer | : | 05/05/2026 |
| Order uploaded on | : | 05/05/2026 |